# डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी हे 'मराठी कवितेला नेमके वळण आणि परिणामकारक बळ देणारे' ज्येष्ठ कवी, लेखक, समीक्षक, विचारवंत, वक्ते म्हणून महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरही परिचित आहेत. संवादशास्त्र व माध्यमशास्त्रातील तज्ज्ञ म्हणून त्यांचा लौकिक आहे.

मानवी जीवनाच्या समकालीन समस्यांचा वेध घेऊन त्याच्या आकलनासाठी समाजाला माध्यम-साक्षर करणाऱ्या विचार-चळवळीचे ते प्रवर्तकही आहेत. संवाद व माध्यमाच्या ज्ञानशाखेचा परिचय संवाद व माध्यम विषयक आपल्या अनेक ग्रंथांद्वारे मराठी भाषेतून प्रथमच करुन देण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या या कार्यावर साधना ट्रस्ट, पुणे आणि मुंबई मराठी पत्रकार संघाने चर्चासत्रेही घडवून आणली आहेत. या क्षेत्रातील त्यांच्या कार्याबद्दल ट्रांस आशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने, 'द पिलर्स ऑफ हिंदुस्थानी सोसायटी' या प्रतिष्ठित पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

सध्या ते अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आहेत.

त्यांचे 'सळाळ आणि सळाळनंतर..', 'समायत', 'मथितार्थ' आणि 'इत्यादि' हे 'ग्रंथाली' प्रकाशित चार कवितासंग्रह, 'हस्तक्षेप' हा सामाजिक लेखसंग्रह, 'हवी तशी नक्षी' हा मुक्त ललित चिंतन संग्रह, 'युगवाणी'तील संपादकीय लेखनाचा 'युगसंवाद' हा संग्रह, 'आकलन' हा समीक्षा लेख संग्रह, तसेच 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र: एका वादाची सद्यस्थिती' आणि 'जागतिकीकरण, संवाद-माध्यमे आणि फेर मांडणीचे नवे आव्हान' तसेच संवाद व माध्यम विषयक, 'फ्रंटिअर्स ऑफ कम्युनिकेशन' , 'संवादशास्त्र', 'जनसंवाद आणि जनमाध्यम: सैद्धांतिक संकल्पन', 'सुसंवाद : इतरांशी, स्वत:शी', 'माध्यम, पत्रकारिता आणि आपण', 'मास मिडिया : कम्युनिकेशन, थिअरी, रिसर्च अँड कल्चर', 'ज्ञानेश्वरी : संवाद शास्त्रीय आकलनाचा एक प्रयत्न', 'प्रसार माध्यमांची स्वायत्तता : किती खरी? किती खोटी?' हे ग्रंथ तसेच 'जाहिरातींचे शैलीशास्त्र' व 'माध्यमाची नीतीमत्ता' हे संशोधनपर ग्रंथ हे ग्रंथही प्रकाशित आहेत.

त्यांच्या मराठी कविता संग्रहाचा हिंदी अनुवादही प्रकाशित आहे.

या शिवाय 'सहिष्णुतेचे बांधकाम', 'अवलोकन', 'व्यक्तिविशेष', 'संदर्भासहित', 'असे-तसे', 'काहीही', 'स्तंभलेखन' हे ग्रंथही प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

येळ्ळूर (कर्नाटक) येथे झालेल्या १२ व्या मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जरूड येथे झालेल्या गाडगेबाबा साहित्य संमेलनाचे, सावनेर येथे झालेल्या पहिल्या साहित्य-संस्कृती संमेलनाचे तसेच बोली साहित्य संघाच्या नागपूर येथील पहिल्या कविता संमेलनाचेही ते अध्यक्ष राहिले आहेत.

सांस्कृतिक-सामाजिक-वाङ्मयीन, नाट्य इ. चळवळीतील सामाजिक आशयाच्या 'स्ट्रीट प्ले', 'स्ट्रीट-पोएट्री', 'समांतर कला चळवळ', 'पोस्टर पोएट्री' अशा चळवळी तसेच 'जिल्हा साहित्य संमेलने','विश्व मराठी साहित्य संमेलन','जिल्हा मराठी संमेलने', 'विवेकानंद विचार संमेलन', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संमेलन', 'महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी' व 'अखंड महाराष्ट्र समिती' चे ते प्रवर्तक आहेत. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची मुहूर्तमेढ रोवणारे तसेच सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्राला विवेकी, समंजस व पुरोगामी वळण लावणाऱ्या अध्वर्युंपैकी ते एक अग्रणी व्यक्तिमत्व आहे. विदर्भ-मराठवाडा- पुणे यांच्या समन्वयाने व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ऐक्याचे ते एक महत्त्वाचे प्रतीक मानले

जातात.

'संस्कृति' क्षेत्राचा विकासाच्या संकल्पनेत स्वतंत्रपणे समावेश व्हावा, या क्षेत्राला विविध स्तरावरील नियोजन व विकास यंत्रणा- मंडळे यावर प्रतिनिधीत्व लाभावे याचे प्रयत्न त्यांनी चालविले आहेत.

सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक सौहार्द व सलोखा टिकवून धरण्याचे व बहुसांस्कृतिक, धर्मनिरपेक्ष समाज निर्मितीचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे.

'युगवाणी' या महत्वपूर्ण दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकाचे सुमारे एक दशक संपादन त्यांनी केले आहे.

उत्कृष्ठ संपादनाचे मराठीतील तीनही प्रतिष्ठित पुरस्कार त्यांनी संपादित केलेल्या 'श्रीवत्स' या वार्षिकाला एकाच वर्षी लाभले होते.

'दै. लोकमत' च्या 'साहित्य जत्रा' या रविवार पुरवणीच्या त्यांच्या संपादनाने मराठी पुरवणी पत्रकारितेवर स्वत:च्या संपादन कौशल्याचा वेगळा ठसा त्यांनी उमटवलेला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य या नात्याने महामंडळाच्या कामकाजाला घटनात्मक नैतिकतेचे वळण लावण्याचे कार्य त्यांनी केले असून विदर्भ साहित्य संघाचे ते गेली २५ वर्षे उपाध्यक्ष आहेत.

भारत सरकारच्या नॅशनल बुक ट्रस्टच्या मराठी विषयक राष्ट्रीय सल्लागार समितीचे ते सदस्य आहेत.

राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या महाराष्ट्र राज्याच्या भाषा, साहित्य आणि संस्कृति विषयक संस्थांच्या एकत्रीकरणाच्या घेतल्या गेलेल्या निर्णयानंतर, त्याबाबत अभ्यास करुन त्या निर्णयाची व्यवहार्यता, संयुक्तिकता किंवा कसे हे तपासून अहवाल व शिफारशी देण्यासाठी राज्याने नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीचे ते अध्यक्ष राहिले आहेत.

'विदर्भाचा संस्कृती आधारित विकास' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी स्थापण्यात आलेल्या विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या उपसमितीचे ते सदस्य आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विद्या विभागाचे ते पहिलेच पूर्ण वेळ प्राध्यापक व विभागप्रमुख होते. सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या मध्यभारत शाखेच्या गोखले संवाद-माध्यम अध्ययन-संशोधन संस्थेचे मानद संचालक म्हणून काम करताना मध्यभारतातील संवाद-माध्यम शिक्षणाचा सेवाभावी क्षेत्रातला पाया त्यांनी रचला आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत्सभेवर तीन वर्षे संवाद-माध्यम तज्ज्ञ म्हणून त्यांची नियुक्ति केली गेली होती.

भारत सरकारच्या भारतीय जनसंचार संस्थानने नव्याने सुरू केलेल्या मराठी पत्रकारितेच्या पदविका अभ्यासक्रमाची सुरूवात नवी दिल्ली येथून त्यांच्या हस्ते करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाच्या सांस्कृतिक समितीचे तसेच नागपूर नगर त्रिशताब्दीच्या राज्य उच्चाधिकार समितीचेही ते सदस्य राहिले आहेत.

त्यांचे ग्रंथ-कविता यांचे विद्यापीठांमधून अध्यापन-अध्ययनही केले जाते.